BSJAY भगतसिंह जनअधिकार यात्रा पुस्तिका - 05

# जात-धर्माचे झगडे सोडा खऱ्या लढाईशी नाते जोडा!



## अश्फ़ाक-बिस्मिलचा संदेश हिंदू-मुस्लिम सर्वांचा देश!

## भगतसिंह जनअधिकार यात्रा

**बेरोजगारी, महागाई, भ्रष्टाचार, धर्मवाद आणि कष्टकरी जनतेच्या लुटीविरोधात!**

**रोजगार, शिक्षण, आरोग्यसेवा, निवास आणि झुंजार जन-एकजुटीसाठी!**

# जात-धर्मांचे झगडे सोडा!
# खऱ्या लढाईशी नाते जोडा!!

BHAGAT SINGH JAN ADHIKAR YATRA

BSJAY

सहयोग मूल्य : 10 रुपये

“

धर्मवाद नेहमीच
संस्कृतीचे दाखले देतो.
त्याला त्याच्या खऱ्या
रूपात बाहेर येण्याची
कदाचित लाज वाटते,
म्हणूनच तो सिंहाची
कातडी घालून जंगलात-
ल्या प्राण्यांवर वर्चस्व
गाजवणाऱ्या गाढवासार-
खा, संस्कृतीचे कातडे
ओढून येतो.”

(प्रेमचंद, धर्मवाद आणि
संस्कृती)



भगतसिंह जनअधिकार यात्रेकरिता प्रकाशित
मे 2023
**प्रकाशक**: परमेश्वर जाधव, संपर्क: 77983 64729
**मुद्रणस्थळ**: आर. एस. प्रिंटर्स, 455, शनिवार पेठ, पुणे-411030
**सहयोग मूल्य:** रु. 10/-
www.bsjayatra.com, fb.com/bsjayatra

## जनतेची खरी धर्मनिरपेक्षता म्हणजे काय?

काँग्रेसच्या खोटा सेक्युलरिझममुळे (धर्मनिरपेक्षता किंवा 'सर्वधर्म समभाव') आणि भाजपच्या धर्मवादी फॅसिस्ट राजकारणामुळे हा शब्द खूपच कलंकित झाला आहे. म्हणूनच आपण प्रथम या शब्दाचा अर्थ समजून घेतला पाहिजे. याचा नेमका अर्थ काय? आधुनिक युगाच्या सुरुवातीस युरोपमध्ये या शब्दाचा उगम झाला जेव्हा समाजातील प्रगतीशील आणि क्रांतिकारी गटांनी राज्यसत्ता आणि धर्म वा धार्मिक संस्थांच्या संगनमताला विरोध केला आणि मागणी केली की **सरकार आणि सत्तेचा धर्माशी काहीही संबंध नसावा; जोपर्यंत इतर कोणाच्याही धार्मिक स्वातंत्र्यावर किंवा श्रद्धा स्वातंत्र्यावर हल्ला होत नाही तोपर्यंत धर्म ही प्रत्येक नागरिकाची पूर्णपणे वैयक्तिक बाब असावी; प्रत्येक नागरिकाला कोणत्याही धर्माचे पालन करण्याचे किंवा कोणत्याही धर्माचे पालन न करण्याचे स्वातंत्र्य असले पाहिजे; कोणताही राजकीय नेता धर्माला किंवा धार्मिक ओळखीला राजकारण आणि समाजजीवनाशी जोडणार नाही. केवळ अशा सत्तेला आणि अशा सरकारलाच धर्मनिरपेक्ष सत्ता आणि धर्मनिरपेक्ष सरकार असे म्हटले गेले.** पुढे जगातील विविध देशांतील प्रबुद्ध, लोकशाही आणि प्रगतीशील मध्यमवर्ग आणि क्रांतिकारी कामगार वर्गानेही हीच मागणी उचलून धरली कारण त्यांनी पाहिले की धर्म आणि राजकारण यांच्या मिश्रणाने सत्ताधारी-शोषक गटांना फायदा होतो आणि सामान्यांचे फक्त नुकसान होते. अल्पसंख्याक शोषक वर्ग धर्माचा वापर नेहमीच आपले अपयश लपवण्यासाठी, धर्माच्या नावावर सामान्य जनतेमध्ये फूट पाडण्यासाठी, आणि त्यांच्या शोषणाला व अत्याचारांना धार्मिक वैधता (औचित्य) देण्यासाठी करतात.

**म्हणायला स्वातंत्र्यानंतर भारताने घटनात्मकदृष्ट्या स्वतःला 'सेक्युलर' (धर्मनिरपेक्ष) राज्य घोषित केले, पण भारत खऱ्या अर्थाने धर्मनिरपेक्ष राज्य कधीच राहिला नाही.** अन्यथा धर्माच्या आधारे वैयक्तिक कायद्याचे स्वातंत्र्य, धार्मिक संस्थांद्वारे धार्मिक शिक्षण, पोलीस ठाण्यात मंदिर, शाळांमध्ये धार्मिक

प्रार्थना इत्यादींचे स्वातंत्र्य नसते. मतपेढीच्या राजकारणासाठी धार्मिक भावनांशी खेळणे, धार्मिक उन्माद पसरवणे, तुष्टीकरण आणि दंगली घडवणे असे धोरण सुरुवातीपासूनच प्रत्येक निवडणूकबाज पक्ष अवलंबत आला आहे; मग ते काँग्रेसने वेळोवेळी खेळलेले मवाळ धर्मवादी तुष्टीकरणाचे पत्ते असोत, शाहबानोसारखे मुद्दे असोत जिथे इस्लामिक कट्टरवादाला खतपाणी घालण्यात आले किंवा भाजप आणि संघ परिवाराने थेट पसरवलेला धार्मिक उन्माद आणि कट्टरता असो, ज्याचे परिणाम विशेषत: गेल्या चार दशकात दंगलींच्या रूपाने देशाला भोगावे लागले आहेत.

**धर्मनिरपेक्षतेचा अर्थ सरकार किंवा राज्यसत्तेने 'सर्व धर्मांना समान वागणूक देणे' असा नाही. याचा अर्थ राज्यसत्ता आणि सरकार यांचा कोणत्याही धर्माशी काहीही संबंध न ठेवता केवळ लोकशाही पद्धतीने बनवलेल्या राज्यघटनेशी निष्ठा असणे असा आहे.** ही अजून एक वेगळी बाब आहे की आपल्या देशाची राज्यघटनाही लोकशाही पद्धतीने बनवली गेली नाही, कारण ज्या संविधान सभेने ती तयार केली ती सार्वत्रिक मताधिकाराच्या आधारे निवडून आली नव्हती तर देशातील शेठ, व्यापारी, जमीनदार यांनी त्यांच्या 11 टक्के लोकांना मिळालेल्या मताधिकाराच्या आधारे ती निवडली होती. तिच्यात ना देशातील कामगार-शेतकरी होते, ना सामान्य स्त्रिया. नेहरूंनी सार्वत्रिक मताधिकाराच्या आधारे संविधान सभा बोलावण्याचे आश्वासन दिले होते जे कधीच पूर्ण झाले नाही. मात्र, या अलोकशाही पद्धतीने बनलेल्या राज्यघटनेतही भारताला धर्मनिरपेक्ष, लोकशाही आणि समाजवादी देश म्हटले आहे. पण प्रत्यक्षात भारतातील सत्ता खऱ्या अर्थाने, प्रगतीशील आणि क्रांतिकारी अर्थाने, धर्मनिरपेक्ष कधीच नव्हती. धर्मनिरपेक्षतेशी जोडलेली एकच गोष्ट आहे की इथे राज्यसत्तेचा कोणताही अधिकृत धर्म नाही; पण धर्मनिरपेक्ष होण्यासाठी हे पुरेसे नाही.

## खऱ्या अर्थाने धर्मनिरपेक्ष असण्याची गरज का आहे?

धर्मनिरपेक्ष असण्याची गरज आहे कारण राजकारणाचा आधार सर्व कष्टकरी जनतेच्या गरजा, हितसंबंध, समस्या, अभाव आणि दुःख यांच्यावर विचार करणे असला पाहिजे, मग त्यांचा धर्म कोणताही असो; संपूर्ण कष्टकरी जनतेच्या गरजा आणि हितसंबंधांची पूर्तता व्हावी आणि त्यांच्या समस्या, दुःख आणि वंचना दूर व्हाव्यात, मग त्यांचा धर्म कोणताही असो, हा राज्यसत्तेचा आधार असला पाहिजे.

तिचा आधार परोपजीवी आणि लुटारू गटांचे विशेषाधिकार संपवून, त्यांच्या हातून सत्ता हिसकावून कष्टकरी जनतेच्या हातात देणे हा असला पाहिजे. हाच योग्य, खऱ्या आणि जनपक्षधर राजकारणाचा आधार असला पाहिजे. यात कोणाचा धर्म काय आहे किंवा कोणाचा काय धर्म नाही याला स्थान नसले पाहिजे. **रोजगार, शिक्षण, घर, आरोग्यव्यवस्था इत्यादी मूलभूत हक्क मिळण्याशी लोकांच्या श्रद्धेचा किंवा धर्माचा काय संबंध आहे किंवा असावा? प्रत्येक नागरिकाने त्याच्या कुवतीनुसार व क्षमतेनुसार उत्पादक श्रमातून समाजाला योगदान द्यावे आणि त्या बदल्यात राजकीय व्यवस्थेने त्याच्या मूलभूत गरजा भागवाव्यात, याचा धर्माशी काय संबंध?** कोणत्याही धर्माचे, कोणत्याही उपासनेच्या पद्धतीचे पालन करणे किंवा कोणत्याही धर्माचे किंवा उपासनेच्या पद्धतीचे पालन न करणे हे कोणाचेही लोकशाही स्वातंत्र्य आहे. त्याचा संबंध फक्त आणि फक्त त्याच्या वैयक्तिक जीवनाशी आहे, त्याच्या सामाजिक किंवा राजकीय जीवनाशी अजिबात नाही.

**इतिहास साक्ष आहे की जेव्हा देशाचे राज्यकर्ते जनतेला शिक्षण, रोजगार, आरोग्य, घर असे मूलभूत हक्क देऊ शकत नाहीत, तेव्हा त्यांच्याकडून धर्माचा मुद्दा राजकारणात उचलला जातो, धर्माचे राजकारण केले जाते.** कारण तेव्हा सामान्य जनतेच्या असंतोषाला वळवण्यासाठी, तिची दिशाभूल करण्यासाठी आणि जनतेत फूट पाडण्यासाठी राज्यकर्त्यांना धर्माच्या नावाने आरडाओरडा आवश्यक झालेला असतो. म्हणूनच शहीद-ए-आझम भगतसिंह म्हणाले होते.

> *"सगळ्या दंगलींवर जर काही इलाज असेल, तर तो भारताची आर्थिक स्थिती सुधारूनच होऊ शकतो. खरे तर भारतातील सामान्य लोकांची आर्थिक स्थिती इतकी बिकट आहे की एक माणूस दुसऱ्याला चार आणे देऊन बदल्यात तिसऱ्याचा अपमान करवू शकतो. भूक आणि दु:खाने हताश होऊन माणूस सर्व तत्त्वे बाजूला सोडतो. खरंच, मरायचे नाही तर काय करायचे... लोकांनी एकमेकांशी भांडू नये यासाठी वर्गजाणिवेची गरज आहे. गरीब, मजूर आणि शेतकरी यांना स्पष्टपणे समजावून सांगितले पाहिजे की त्यांचे खरे शत्रू भांडवलदार आहेत. म्हणूनच तुम्ही त्यांच्या युक्त्यांपासून दूर राहा आणि त्यांच्याकडून फसून काहीही करू नका. जगातील सर्व गरिबांचे वंश, रंग, धर्म किंवा राष्ट्राचा विचार*

*न करता समान हक्क आहेत. धर्म, रंग, वंश, राष्ट्रीयता आणि देश हे भेदभाव नष्ट करून तुम्ही संघटित व्हा आणि सरकारची सत्ता तुमच्या हातात घेण्याचा प्रयत्न करा, यातच तुमचे हित आहे. या प्रयत्नांमुळे तुमचे नुकसान होणार नाही, एक दिवस तुमच्या साखळ्या तुटतील आणि तुम्हाला आर्थिक स्वातंत्र्य मिळेल."*

*(भगतसिंह, जातीय दंगली आणि त्यांचे उपाय, 1928)*

मित्रांनो, आपल्या महान शहीद क्रांतिकारक आणि विचारवंत भगतसिंहांना वयाच्या 21 व्या वर्षी जे समजले होते ते आजपर्यंत आपण समजू शकलो नाही. गरीब कष्टकरी हिंदू, मुस्लीम, शीख आणि ख्रिश्चन हे सर्व दरवर्षी दंगलीत आपले प्राण आणि संपत्ती गमावून याची किंमत मोजतात.

**धर्माच्या उन्मादात सामान्य लोक का वाहून जातात?** याचे उत्तर शहीद-ए-आझम भगतसिंह यांनी वरील अवतरणातच दिले आहे. याचे कारण असे की नफेखोर व्यवस्थेत लोक उपासमार, महागाई, बेरोजगारी, निरक्षरता, अपसंस्कृती आणि बेघरपणाने त्रस्त, थकलेले आणि संतप्त असतात. शहीद-ए-आझम भगतसिंह ज्या क्रांतिकारी पक्षाविषयी बोलत होते, त्या प्रकारचा क्रांतिकारी पक्ष अस्तित्वात असेल तर त्यांच्या संतापाला क्रांतिकारी रूप देता येईल. पण जर धर्मवादी आणि पंथवादी शक्ती समाजात वर्चस्वशाली असतील तर त्या सामान्य लोकांच्या या रागाचे रूपांतर आंधळ्या प्रतिक्रियेत करतात, ज्यामुळे सामान्य लोक एकमेकांशीच भांडू लागतात. **तर्क आणि विज्ञानाच्या अभावी, त्यांना हे समजत नाही की त्यांच्या जीवनातील या समस्यांसाठी ती व्यवस्था जबाबदार आहे, जी काही मुठभर धनाढ्य, व्यापारी, कंत्राटदार, धनिक शेतकरी आणि दलालांच्या नफ्यासाठी सर्व उत्पादन, देवाणघेवाण आणि वितरण करते, ना की समाजातील त्या कष्टकरी लोकांच्या गरजेनुसार, जे सुईपासून जहाजापर्यंत सर्व काही बनवतात आणि संपूर्ण समाज जिवंत ठेवतात व चालवतात.** सर्वात महत्त्वाचे म्हणजे या मालक, शेठ, व्यापारी यांच्या देणग्यांवर चालणारे सर्व निवडणूकबाज पक्ष जनतेची दिशाभूल करून हिंदूचा शत्रू मुस्लिम, मुस्लिमांचा शत्रू हिंदू, बहुसंख्यांक धर्मीय समाजाचा शत्रू अल्पसंख्याक धर्मीय समाजाचे लोक, "उच्च" जातीच्या लोकांचे शत्रू हे "खालच्या" जातीचे लोक आहेत, वगैरे ग्वाही देतात. तुम्ही कधी विचार केला आहे का की जगातील सर्व देशांमध्ये विविध समुदायांमध्ये दंगली तेव्हाच घडल्या आहेत जेव्हा ते देश आर्थिक, सामाजिक आणि राजकीय संकटाचा सामना

करत होते, जेव्हा बेरोजगारी, महागाई आणि गरिबी शिगेला पोहोचली होती!

त्याचबरोबर सत्ताधारी वर्गाचे प्रतिनिधित्व करणारे पक्ष, त्यांचे विचारवंत, त्यांची प्रसारमाध्यमं आणि त्यांची शिक्षण व्यवस्था बेरोजगारी, महागाई इत्यादी प्रश्नांना नैसर्गिक संकटाच्या स्वरूपात मांडतात, जणू काही त्या भूकंपासारख्या आहेत, ज्यावर कुणाचेही नियंत्रण नाही! **पण जरा विचार करा, खायला अन्न नाही म्हणून देशात उपासमार आहे का?** वस्तुस्थिती बघितली तर कळेल की असे अजिबात नाही. भारतातील शेतमजूर आणि गरीब शेतकरी त्यांच्या मेहनतीने पुरेसे तांदूळ, गहू, डाळी आणि इतर धान्ये आणि भाजीपाला इत्यादींचे उत्पादन करतात. सत्य हे आहे की *संयुक्त राष्ट्रांच्या पर्यावरण कार्यक्रमाच्या फूड वेस्ट इंडेक्स* 2021 नुसार, **भारतात दरवर्षी सरासरी 68.8 लाख टन अन्नधान्य वाया जाते, कुजते आणि उंदीर खातात. ज्या देशात 5 वर्षांखालील 5000 मुले दररोज उपासमार आणि कुपोषणामुळे मरतात, तेथे दरवर्षी 6.88 दशलक्ष टन कसे वाया जातात?** कारण हे अन्न आणि भुकेले लोक यांच्यामध्ये एक भिंत आहे: नफ्याची भिंत. हे सर्व धान्य गरजू लोकांमध्ये वाटले तर धान्य विकून नफा कमावणारे श्रीमंत शेतकरी, कंपन्या, व्यापारी, मध्यस्थ आणि आडते यांचा नफा कुठे जाणार? शिवाय, संपूर्ण मालक वर्गाची इच्छा आहे की गरीब कामगार लोकसंख्या सतत उपाशी आणि गरजू राहावी, कारण तरच ते सरासरी वेतन कमी करू शकतात आणि त्यांना किमान वेतनावर काम करण्यास भाग पाडून सरासरी नफा वाढवू शकतात. जेव्हा मालक वर्ग मंदीने ग्रासलेला असतो, तेव्हा त्याने फेकलेल्या तुकड्यांवर जगणाऱ्या पक्षांची सरकारे सरासरी वास्तविक वेतन कमी करण्यासाठी विविध उपाययोजना करतात. सध्याच्या युगात, नवीन श्रम संहितांनुसार, मोदींनी 8 तास कामाचा दिवस संपवण्याची, ॲप्रेंटीस आणि ट्रेनींना किमान वेतनापेक्षा कमी वेतनात 10-10, 12-12 तास काम करायला लावण्याची, लहान मुले आणि किशोरवयीन मुलांकडून काम करवण्याची सर्व व्यवस्था अशीच थोडी केली आहे!

उपासमारीच्या समस्येबद्दलची हीच गोष्ट बेघरांच्या समस्येला देखील लागू आहे. 2012 मध्येच भारत सरकारने म्हटले होते की बेघरांची समस्या सोडवण्यासाठी भारतात 1.878 कोटी घरांची गरज आहे. भारतात घरांची कमतरता आहे का? चला, बघूया. 2011 च्या जनगणनेच्या आकडेवारीनुसार फक्त शहरांमध्येच 1.1 कोटी घरे रिकामी होती कारण त्यांना खरेदीदार मिळत नव्हते! या घरांमध्ये 5 कोटी लोकांना आसरा मिळू शकला असता. पण लोक हिवाळ्यात फूटपाथवर

थंडी वाजून मरतात आणि उन्हाळ्यात रस्त्यावर उष्माघाताने मरतात; पण घरांची कमतरता नसूनही त्यांच्या डोक्यावर छप्पर उपलब्ध होत नाही. ही घरे बांधण्यासाठी ज्यांनी रक्त, घाम गाळला आणि जीवही गमावला, त्याच लोकांना एक छप्परही दिले जात नाही, कारण घरांची मक्तेदारी परोपजीवी बांधकाम व्यावसायिकांची आहे, जे घरे बांधण्यात अंगुलीमात्रही कष्ट करत नाहीत. फक्त त्यांच्याकडेच वारसाहक्काने मिळालेल्या भांडवलावर आणि उत्पादनाच्या साधनांवर मक्तेदारी आहे, जी पूर्वीच्या काळात कष्टकरी उत्पादकांकडून लुटूनच जमा झाली होती आणि जी प्रत्यक्षात समाजातील थेट उत्पादकांचीच सामूहिक संपत्ती आहे. **न्यायाने तर एका जनपक्षधर सरकारने आणि व्यवस्थेने प्रत्येक नागरिकाला शासकीय निवासस्थानाचा हक्क दिला पाहिजे आणि त्या बदल्यात समाजाच्या विकासासाठी उत्पादक श्रमाचे योगदान प्रत्येक नागरिकाने देणे बंधनकारक असले पाहिजे.** परंतु समाजातील 80 टक्के लोक या ना त्या मार्गाने उत्पादक श्रमात सहभागी होतात, परंतु त्यांचे सर्व हक्क हिरावून ते लोक घेतात ज्यांच्या विलासितेचे आणि ऐश्वर्याचे बुरूज जनतेच्या अश्रूंच्या समुद्रात उभे आहेत: ते म्हणजे मालक, कंत्राटदार, श्रीमंत व्यापारी, श्रीमंत भांडवली शेतकरी, बिल्डर, प्रॉपर्टी डीलर्स, दलाल, मध्यस्थ, नेते, नोकरशहांचा संपूर्ण वर्ग, म्हणजे व्हीआयपी लोक, ज्यांच्या चकचकीत गाड्या जाण्यासाठी रस्त्यांवरून गरिबांना बेदखल केले जाते. गोरख पांडे यांची ही कविता यावरूनच आठवते:

*बंधू आणि भगिनींनो!*
*आता ही आलिशान इमारत*
*बनून तयार आहे*
*आणि आता तुम्ही येथून निघू शकता*
*...*
*कुठे जायचे ते विचारू नका*
*पाहिजे तिथे जा*
*सध्या त्या अंधारात*
*जमिनीच्या तुकड्यावर*
*ज्या झोपड्या ठोकल्या आहेत*
*त्याही रिकाम्या करा.*
*मग जा पाहिजे तिकडे.*

*तुम्ही मुक्त आहात*
*आमची जबाबदारी संपली आहे*
*अगदी एका मिनिटासाठी सुद्धा*
*तुमचे इथे राहणे ठीक नाही,*
*महामहीम येत आहेत*
*परदेशी पाहुण्यांसोबत.*
*अप्सरा येणार आहेत*
*आणि अधिकारी मंडळी*
*पाश्चात्य धुनींवर सुरू होणार आहे*
*उन्मादक नृत्य.*
*खळाळतील दारूचे ग्लास*
*तर तुमची इथे काय गरज असू शकते?*
*आणि तुम्हाला इथे पाहून त्यांना काय वाटेल?*
*घाणेरडे कपडे आणि धुळीने माखलेले शरीर*
*नीट बोलण्याची आणि हात मिळवण्याची सुद्धा अक्कल नाही.*
*त्यांच्या रुची आणि अपेक्षांना*
*किती धक्का लागेल*
*आणि आमचा किती अपमान होईल.*
*...*
*कदाचित तुमच्या या विशाल आणि सुंदर निर्मितीबद्दल,*
*तुम्ही मोहित आहात*
*तिला सोडून जाण्याचं दुःख होतंय*
*असं होऊ शकते!*
*पण याचा अर्थ असा तर नाही*
*की जे तुम्ही तुमच्या हातांनी बनवाल,*
*ते सर्व तुमचे असेल.*
*अशा प्रकारे तर संपूर्ण जग तुमचे होईल,*
*मग आम्ही मालकांनी कुठे जायचे?*
*लक्षात ठेवा*
*मालक, मालक आहे*

*मजूर, मजूर.*
*तुम्ही काम करायचं*
*आम्ही भोगायची फळं*
*तुम्ही बनवायचा स्वर्ग*
*आम्ही करायचा त्यात विहार.*
*असे वाटत असेल*
*की तुम्हाला तुमच्या कामाचे*
*पूर्ण फळ मिळायला हवे*
*तर होऊ शकते की*
*गेल्या जन्मातील तुमचे काम*
*तुम्हाला अभावाच्या नरकात नेत आहेत.*
*विश्वास ठेवा*
*धर्माशिवाय दुसरा मार्ग नाही,*
*आता तुम्ही येथून निघू शकता.*
*— (गोरख पांडे, स्वर्गाचा निरोप)*

**या कवितेने एक सामाजिक सत्य अगदी अचूक पकडले आहे. तुम्हाला वाटत नाही का?**

अन्न आणि घराप्रमाणेच, आपल्यासारख्या सामान्य लोकांना ज्या सर्व अभावांचा सामना करावा लागतो त्यांचे कारण सुद्धा वास्तविक अभाव नसून नफा-केंद्रित लुटखोर व्यवस्थेने निर्माण केलेला कृत्रिम अभाव आहे. ना आपल्या सुजलाम-सुफलाम धरतीवर साधनसंपत्तीची कमतरता आहे, ना काम करू शकणाऱ्या कुशल, सक्षम हातांची व मेंदूची. पण सर्व क्षमता आत्मसात केल्यानंतर सुद्धा एक सामान्य घरातील युवक पदव्या हातात घेऊन रस्त्यावर भटकत भटकत भर तारुण्यात म्हातारा होतो. निराशा त्याच्या डोळ्यावर काळ्या अंधारासारखी पसरते. चेहऱ्यावर सुरकुत्या उमटतात. **हिंदू असो, मुस्लीम असो, शीख, ख्रिश्चन असो, सवर्ण असो, दलित असो, मागासलेले असो, आपणा सर्वांसोबत हे घडते... जर तुम्ही सामान्य कष्टकरी घरात जन्माला आला असाल तर हाच तुमचा गुन्हा आहे.** आणि जर तुम्ही तोंडात चांदीचा चमचा घेऊन जन्माला आला असाल, तुम्ही अव्वल दर्जाचे नालायक, निरूपयोगी असाल तरीही तुम्हाला उच्च खुर्ची मिळते, तुम्हाला भारतीय

क्रिकेट बोर्डाचे अध्यक्षही बनवले जाऊ शकते, मग जरी तुम्ही सांगू शकत नसाल की बॅट आणि बॉल मधील बॉल कोणता आहे आणि बॅट कोणती आहे!

एखाद्या अशा देशात आपण साहजिकच रागावतो, आपण आपल्या आर्थिक आणि सामाजिक असुरक्षिततेमुळे त्रस्त होतो, चिडचिडतो, याला जबाबदार कोण हे आपल्याला कळत नाही, आपण शत्रूचा शोध घेतो. पण अनेकदा या नफेखोर व्यवस्थेचे आणि तिच्या शीर्षस्थानी बसलेल्या शेठ-व्यापारी-भूस्वामी-श्रीमंत शेतकरी वर्गाचे आपल्याकडे कोणतेही विश्लेषण नसते, हे विश्लेषण उपलब्ध करून देईल असे राजकीय नेतृत्व नसते. मग असुरक्षिततेने आणि अनिश्चिततेने त्रस्त आपल्या समुदायासमोर अचानक कोणीतरी धर्माचा झेंडा फडकावत येतो आणि सांगतो की तुमचे शत्रू तर इतर धर्माचे लोक आहेत; आपल्यासमोर छद्म शत्रूची, म्हणजेच खोट्या शत्रूची प्रतिमा तयार केली जाते, जेणेकरून खरा शत्रू लपवता आणि वाचवता येईल; त्या छद्म-शत्रूबद्दलच्या सर्व मिथकांची वारंवार पुनरावृत्ती केली जाते जेणेकरून ते आपल्याला खरे वाटू लागतात; या कामात सर्व प्रसारमाध्यमे राज्यकर्त्यांना साथ देतात कारण मीडिया हा ‘लोकशाहीचा चौथा स्तंभ’ नसून धनिक वर्गाच्या बंगल्यांचा आधारस्तंभ आहे, ज्याचा उपयोग धनाढ्यांचे पाळीव कुत्रे योग्य कामासाठी करत राहतात. प्रसारमाध्यमेच सर्वात धोकादायक दंगलखोर म्हणून समोर येतात आणि अशा असत्य व अफवांचा असा पाऊस पाडतात की आपल्याला विचार करायला वेळ मिळत नाही. आपण गरिबी, भीती आणि असुरक्षितता-अनिश्चिततेने इतके थकलेलो, निराश झालेलो आणि नाराज असतो की धर्मवादी शक्तींनी निर्माण केलेल्या एका खोट्या शत्रूप्रती आपली आंधळी प्रतिक्रिया आपल्याला एकमेकांचे शत्रू बनवते. या शेठ-व्यापाऱ्यांचा वर्गच आपल्या हातात त्रिशूळ आणि तलवारी देऊन दंगलींमध्ये झोकून देतो. अशाप्रकारे आपल्या कष्टकरी समाजाच्या अंगावर जळूसारखे चिकटलेले मुठभर राज्यकर्तेच आपल्यात फूट पाडण्यात आणि आपल्याला आपापसात भांडायला लावण्यात यशस्वी होतात. हेही लक्षात ठेवा की हे राज्यकर्ते स्वतः धर्माच्या नावाने कधीच एकमेकांची डोकी फोडत नाहीत, ना त्यांच्या मुलांच्या हातात कधी दंगलींची हत्यारे देत. त्यांची मुले तर अमेरिका, इंग्लंड, ऑस्ट्रेलिया, जर्मनी, फ्रान्स इत्यादी ठिकाणी शिकतात आणि परत आल्यावर त्यांना वडिलांचे साम्राज्य सोपवले जाते, मग भलेही त्यांना ऊस आणि वेळू यातील फरक कळत नसेल. **भाजप नेते पियुष गोयल यांचा मुलगा हार्वर्ड विद्यापीठात, प्रकाश जावडेकर यांचा मुलगा बोस्टन**

**विद्यापीठात, राजनाथ सिंह, निर्मला सीतारामन आणि एस. जयशंकरच्या मुलांनी लीड्स युनिव्हर्सिटी, नॉर्थवेस्टर्न युनिव्हर्सिटी, जॉर्जटाउन युनिव्हर्सिटी आणि डेनिझेन युनिव्हर्सिटी यांसारख्या परदेशी विद्यापीठांमध्येही शिक्षण घेतले आहे**, जिथे फी दरवर्षी करोडो रुपये आहे; रविशंकर प्रसाद यांच्या मुलाने कॉर्नेल विद्यापीठातून, गजेंद्र सिंह शेखावत यांच्या मुलीने ऑक्सफर्ड विद्यापीठातून शिक्षण घेतले आहे. हे सर्व भाजप नेते असे “देशभक्त” आहेत मग ते आपल्या मुलांना लहानपणापासून संघ परिवाराच्या सरस्वती शिक्षा मंदिरात का पाठवत नाहीत जिथे मुलांच्या मनात जातीय द्वेषाचे विष मिसळले जाते? **त्यांना प्राचीन भारतीय संस्कृतीचे इतके वेड आहे, तर मग ते आपल्या मुलांना कोणत्याही भारतीय विद्यापीठात किंवा गुरुकुलात उच्च शिक्षणासाठी का पाठवत नाहीत**? म्हणजे, भाजपच्या “राष्ट्रवादी” नेत्यांची मुलं ऑक्सफर्ड, केंब्रिज आणि हार्वर्ड विद्यापीठात आणि कॉन्व्हेंट खाजगी शाळांमध्ये शिकतात आणि आमची मुलं जातात सरस्वती शिशु मंदिरात, तिथून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शाखेत आणि नंतर बजरंग दलाच्या दंगल-वाहिनीत जिथे त्यांच्या हातात त्रिशूळ-तलवार दिली जाते. म्हणजे आमच्या मुलांनी जायचे दंगलीच्या कारखान्यात! मग मीडिया आपल्याला सांगतो, “मोदींनी केले आहे तर विचारपूर्वकच केले असेल!” भाजपचा “राष्ट्रवाद” आणि “देशभक्ती”, “धर्मध्वजरक्षा” आणि त्यांचे “चाल-चेहरा-चरित्र” बद्दलचे बोलणे हे आपल्या देशातील सर्वात मोठा घोटाळा आणि धोकेबाजी आहेत.

1928 मध्येच हे सत्य समजून घेणारे आपले लाडके शहीद भगतसिंह यांचे हे शब्द विचारात घ्या:

> *“आतापर्यंत दिसून आले आहे की या **दंगलींमागे धर्मवादी नेते आणि वृत्तपत्रे आहेत**. यावेळी भारतातील नेत्यांनी अशी काही घाण केली आहे की ज्याबद्दल न बोललेलेच बरे. ज्या नेत्यांनी भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्याची विडा आपल्या माथी उचलला आहे आणि जे ‘समाईक राष्ट्रीयता’ आणि ‘स्वराज्य-स्वराज्य’ म्हणताना थकत नाहीत, तेच नेते एकतर तोंड लपवून बसले आहेत किंवा त्याच धर्मांधतेच्या प्रवाहात वाहून गेले आहेत. तोंड लपवणाऱ्यांची संख्या पण कमी आहे का? पण खोदायला लागले तर धर्मवादी चळवळीत सामील झालेले नेते शेकडोंच्या संख्येने निघतील. खूप कमी नेते आहेत ज्यांना मनापासून सर्वांचे भले हवे*

*आहे. आणि धर्मवादाचा एवढा जोरदार पूर आला आहे की ते थांबवू सुद्धा शकत नाहीत. भारतातील नेतृत्वाचे दिवाळे निघाले आहे असे दिसते.*

*"धर्मवादी दंगली भडकावण्यात विशेष भाग घेत राहणारे इतर सज्जन वृत्तपत्रांवाले लोक आहेत. पत्रकारितेचा व्यवसाय एकेकाळी खूप उच्च मानला जायचा. आज तो खूपच घाणेरडा झाला आहे. हे लोक एकमेकांच्या विरोधात मोठमोठे मथळे देऊन लोकांच्या भावना भडकवतात आणि एकमेकांची डोकी फोडायला लावतात. स्थानिक वृत्तपत्रांनी प्रक्षोभक लेख लिहिल्यामुळे एक-दोन ठिकाणीच नव्हे तर अनेक ठिकाणी दंगली झाल्या आहेत. असे फार कमी लेखक आहेत ज्यांचे हृदय आणि मन अशा दिवसांतही शांत राहते.*

*"वृत्तपत्रांचे खरे कर्तव्य शिक्षित करणे, लोकांमधील संकुचितता दूर करणे, धर्मवादी भावना दूर करणे, परस्पर सलोखा वाढवणे आणि भारताचे समाईक राष्ट्रीयत्व निर्माण करणे हे होते, परंतु त्यांनी स्वतःचे मुख्य कर्तव्य अज्ञान पसरवणे, संकुचित विचारसरणीचा प्रचार करणे, धर्मवादी बनवणे, मारामारी करवणे आणि भारताची समाईक राष्ट्रीयता नष्ट करणे बनवले आहे. हेच कारण आहे की भारताची सद्यःस्थिती पाहता डोळ्यांतून रक्ताश्रू वाहू लागतात आणि मनात प्रश्न येतो की 'भारताचे काय होणार?'"*

*(भगतसिंह, जातीय दंगल आणि त्यांवरील उपाय, 1928, जोर आमचा)*

**आज फक्त वृत्तपत्र या शब्दाच्या जागी मीडिया हा शब्द टाका आणि शहीद-ए-आझम यांनी वर्णन केलेली परिस्थिती दहापट वाईट, वाईट आणि पाशवी बनवा, मग हीच आपल्या देशाची आजची परिस्थिती आणि वास्तव नाही का?** काही लोक भगतसिंहांना केवळ बॉम्ब-पिस्तुल उचलणारे शूर क्रांतिकारक मानतात आणि देशाच्या राज्यकर्त्यांना त्यांची अशीच प्रतिमा निर्माण करायची आहे, जेणेकरून आपल्या या महान शहिदाचे विचार आपल्याला कळूच नयेत, आपल्याला हे माहीतच होऊ नये की तो केवळ एक महान युवक क्रांतिकारकच नव्हता, तर एक महान क्रांतिकारी विचारवंतही होता.

या प्रश्नांवर जरा विचार करा बंधू-भगिनींनो!

## काही प्रश्न जे तुमच्या समोर धर्मवादी राजकारणाचे सत्य उघड करतील

प्रिय मित्रांनो, आता आम्ही तुमच्यासमोर काही प्रश्न ठेवू. आपणास विनंती आहे की आपण यावर विचार करा आणि स्वतःच उत्तर देण्याचा प्रयत्न करा.

**जरा विचार करा, दंगली आणि धार्मिक संघर्षात कोणी नेता, कोणी भांडवलदार, कोणी शेठ-व्यापारी का मरत नाही? सर्वसामान्य गरीब मजूर, कष्टकरी, कनिष्ठ मध्यमवर्गीय कष्टकरी लोकांची घरे नेहमी दंगलीत का जाळली जातात? तेच का मरतात? कोणी तोगडिया, कोणी ओवेसी या दंगलीत का मरत नाहीत? कधी एखाद्या सिंघल, योगी, अमृतपाल यांचे घर का जळत नाही?** कारण असावे! याचा विचार करा.

**जरा विचार करा, रस्त्यावर त्रिशूल-तलवारी फिरवून आपल्याच बंधू-भगिनींना मारण्याचे काम "धर्मध्वजरक्षे" सारख्या उद्दिष्टासाठी संघ परिवाराच्या आणि भाजप आणि ए.आय.एम.आय.एम.च्या नेत्यांच्या मुलांकडे का सोपवले जात नाही?** एखाद्या अमूर्त "धर्मध्वजरक्षे"च्या नावाने रस्त्यावर हिंडण्याचे काम आपल्या सामान्य कष्टकरी लोकांच्या मुलांवरच का सोपवले जाते?

जरा विचार करा, गोरक्षणाच्या नावाखाली तुम्हाला भडकवणाऱ्या संघ परिवाराचा आणि **भाजपचा नेता संगीत सोम 'अल दुआ' नावाच्या कत्तलखान्याचा संचालक कसा होता? नागालँडमध्ये बीफ बंदी कधीच होणार नाही असे नागालँडचे भाजप नेते विसासोली ल्होंगू का म्हणाले? मणिपूरमध्ये गोमांस खाण्यावर बंदी नाही, काय खावे ही प्रत्येकाची वैयक्तिक बाब आहे, असे भाजप नेते आणि मणिपूरचे मुख्यमंत्री बिरेन सिंह का म्हणाले?** हे तर योग्यच आहे की अन्न, पेहराव, जीवनशैली ही प्रत्येकाची वैयक्तिक बाब आहे आणि त्यात कोणत्याही पक्षाला किंवा सरकारला हस्तक्षेप करण्याचा अधिकार नाही. मग भाजप हा दुटप्पीपणा का करतो? **मेघालयातील भाजप नेते अर्नेस्ट मावरी यांनी "मी गोमांस खातो, ही मेघालयातील जीवनशैली आहे आणि कोणीही ते रोखू शकत नाही" असे का म्हटले? केरळमधील मलप्पुरममधील उमेदवार भाजप नेते श्रीप्रकाश यांनी गोमांसाचा पुरवठा कमी होऊ देणार नाही आणि गोमांस खाण्यावर कधीही**

**बंदी घातली जाणार नाही, असे आश्वासन का दिले? गोव्यात गोमांसावर बंदी घालण्याचा भाजपचा कोणताही हेतू नाही, असे 2017 मध्ये अमित शहा यांनी का म्हटले?** भाजपचे गुरू विनायक सावरकर म्हणाले होते की गाय हा केवळ प्राणी आहे, माता नाही! यावर भाजपचे काय म्हणणे आहे? काहीही नाही का?

जरा विचार करा, जर 'लव्ह जिहाद'कडे भाजप धोका म्हणून पाहत असेल, तर **भाजप नेते शाहनवाज हुसेन यांचा हिंदू महिलेशी विवाह, भाजप नेते मुख्तार अब्बास नक़्वी यांचा हिंदू महिलेशी विवाह, भाजप नेते सुशील मोदी यांचा ख्रिश्चन महिलेशी विवाह, भाजपचे नेते सिकंदर बख्तचे हिंदू महिलेशी लग्न, भाजप नेते सुब्रमण्यम स्वामी यांच्या मुलीचे मुस्लिमांशी लग्न म्हणजे 'लव्ह जिहाद' नव्हे?** या मूर्खपणावर त्यांनी डोकी फोडावीत म्हणून 'लव्ह जिहाद' फक्त बाकीच्या जनतेसाठीच आहे का? सर्व धर्मातील कट्टरवादी नेते असे दुहेरी जीवन जगतात आणि आपापल्या धर्मातील सर्वसामान्य जनतेला गैर-मुद्द्यांवर भडकवून दंगलीचे वातावरण निर्माण करतात.

म्हणजेच या खोट्या मुद्द्यांवर आपण डोकी फोडूयात, एकमेकांना मारू-कापूयात, आणि आपल्या चितेवर भाकरी भाजण्याचे करतील निवडणूकबाज पक्ष आणि संपूर्ण सत्ताधारी वर्ग, ज्यांचे हे पक्ष प्रतिनिधित्व करतात. हीच त्यांची खरी युक्ती आहे: लोकांमध्ये फूट पाडा आणि राज्य करा. भगतसिंह, राजगुरु, सुखदेव, चंद्रशेखर आझाद, अशफाकुल्ला यांसारखे धाडसी तरुण स्वातंत्र्यलढ्यात बलिदान देत होते, तेव्हा संघ परिवार इंग्रजांविरुद्ध एक शब्दही उच्चारत नव्हता, उलटपक्षी त्याचेच लोक क्रांतिकारकांविरुद्ध खबऱ्याचे काम करत होते, माफीनामे लिहीत होते. 'फोडा आणि राज्य करा' हे धोरण त्यांनी इंग्रजांकडूनच शिकून घेतले आहे. धर्मवादी राजकारणाचे जे विषारी पीक इंग्रजांनी पेरले होते, त्याची कापणी संघ परिवार आणि इस्लामी कट्टरवादी दोघेही आजपर्यंत करत आहेत.

**"एकीकडे जनआंदोलन आणि राष्ट्रीय चळवळी होत असतानाच दुसरीकडे त्यांच्या बरोबरीने जातीय आणि धार्मिक चळवळीही जाणीवपूर्वक सुरू केल्या गेल्या कारण या चळवळी इंग्रजांविरुद्ध किंवा कोणत्याही वर्गाविरुद्ध नसून इतर जातींच्या विरोधात होत्या."**

**- गणेश शंकर विद्यार्थी**

**प्रत्येक धर्मातील कट्टरतावादी आणि जातीयवादी शक्ती एकमेकांना खतपाणी घालतात आणि एकमेकांना त्यांची दुकाने चालवण्यास मदत करतात हे देखील लक्षात ठेवा.** स्वातंत्र्यापूर्वी मुस्लिम लीग आणि हिंदू महासभा या एकाच नाण्याच्या दोन बाजू होत्या आणि या दोघांनीही धर्माच्या आधारे देशाच्या फाळणीचे समर्थन केले होते, याकरिता वाटेल तर तुम्ही स्वतः जिन्ना आणि श्यामा प्रसाद मुखर्जी यांचा इतिहास वाचू शकता. श्यामा प्रसाद मुखर्जी हे भारतीय जनसंघाचे संस्थापक होते, जो भाजपचा पूर्वज पक्ष आहे आणि भाजपचे लोक मुखर्जींना त्यांच्या संस्थापकांपैकी एक मानतात. आजही संघी धर्मवाद आणि इस्लामी कट्टरवाद एकमेकांना पूरक आहेत. इतकेच नव्हे तर प्रत्येक धार्मिक समाजातील कट्टरवादी शक्तीं अन्य धर्मीय समाजातील कट्टरपंथाशी सहकार आणि सहकार्याचे संबंध ठेवतात. आज पंजाबमध्ये अमृतपालचे धार्मिक कट्टरवादाचे राजकारण सुद्धा संघी जातीयवादाच्या राजकारणाला पूरक आहे, मग वरवर दोघे एकमेकांविरुद्ध कितीही आगपाखड करोत. पंजाबचे आपले सर्व समजूतदार मित्र, बंधू आणि भगिनी हे सत्य चांगल्या तऱ्हेने जाणतात. केरळमधील ख्रिश्चन कट्टरवाद आणि संघी धर्मवाद यांच्यातील संघर्षाबाबतही हेच खरे आहे की ते एकमेकांचे पोषण करतात. **धार्मिक अस्मितेवर आधारित राजकारणाची हीच ओळख आहे, आणि हे राजकारण कोण करते आणि त्याचा फायदा कोणत्या वर्गाला किंवा समाजाला होतो?** चला, हे समजून घेऊयात.

**जेव्हा एका शोषक-सत्ताधारी अल्पसंख्याक गटाला बहुसंख्य कष्टकरी जनतेवर सत्ता चालवायची असते, तेव्हा ती फक्त लाठीच्या जोरावर चालू शकत नाही. ती सत्ता आपली धोकादायक विचारधारा आणि दृष्टिकोन लोकांमध्ये पसरवते, जेणेकरून जनता स्वतःची स्थिती स्वीकारेल आणि स्थितीलाच नियतीचे विधिलिखित मानून बसेल.** धर्मवाद आणि जातिवाद या धोकादायक विचारधारा याच वर्गात मोडतात. सर्वसामान्य कष्टकरी बहुसंख्य जनतेला तुकड्या-तुकड्यात विभागून ठेवणे, कधी धर्माच्या नावाखाली उन्माद पसरवून त्यांना भांडायला लावणे, कधी जातीय वर्चस्व आणि अस्मितेच्या राजकारणात अडकवून डोकी फोडायला लावणे, तर कधी प्रदेश-भाषेच्या नावाखाली त्यांना लढवणे, जेणेकरून सामान्य कष्टकरी लोक त्यांच्या समाईक हितांसाठी आणि उद्दिष्टांसाठी त्यांच्या समाईक शत्रूच्या विरोधात, म्हणजे भांडवलदारांविरुद्ध कधीही एकत्र येऊ नयेत हेच त्यांचे उद्दिष्ट असते. आपण खातरीने म्हणू शकतो की, सर्व धर्मात जातीयवादी आणि

**“ती संस्कृती कोणती आहे जिच्या रक्षणासाठी धर्मवाद एवढा जोर लावतोय तेच समजत नाही. खरे तर संस्कृतीची हाक म्हणजे निव्वळ ढोंग, शुद्ध पाखंड आहे. थंडगार सावलीत बसून जरा फिरूयात. हा फक्त साध्यासुध्या माणसांना धर्मवादाकडे ओढण्याचा मंत्र आहे बाकी काही नाही. हिंदू आणि मुस्लीम संस्कृतीचे रक्षक तीच थोर माणसं आणि तेच समुदाय आहेत, ज्यांचा स्वतःवर, आपल्या देशवासीयांवर आणि सत्यावर काहीच विश्वास नाही आणि म्हणूनच अशा शक्तीची त्यांना अनंतकाळपर्यंत गरज वाटते, जी त्यांच्या भांडणात सरपंच म्हणून काम करेल.”**

**- प्रेमचन्द**

कट्टरतावादी राजकारण करणारे हे राजकारणी जेव्हा आपल्या वाढदिवसाच्या पार्टीत, लग्न समारंभात, होळी मिलन, इफ्तार पार्टीत जमतात तेव्हा ते धर्म, जात, भाषा, प्रदेशाच्या नावाने आपल्यात फूट पाडून आपल्याला मूर्ख बनवण्याचा आनंद साजरा करतात आणि आपल्यावर हसतात.

**मग आपण काय करावे? प्रत्येक रंगाच्या धर्मवादी आणि कट्टरवादी शक्तींचे वास्तव समजून घेतले पाहिजे, धनाढ्य-श्रीमंतांच्या हितासाठी त्यांच्याकडून रचले जाणारे कारस्थान समजून घेतले पाहिजे आणि भगतसिंह व त्यांच्या साथीदारांच्या विचारसरणीच्या पायावर उभे राहून, सत्ताधाऱ्यांनी पोसलेल्या विचारसरणीला, दृष्टीकोनाला, षडयंत्राला नाकारले पाहिजे, आणि पूर्णतः धुडकावून लावले पाहिजे.** सर्व धर्मातील कष्टकरी आणि सर्वसामान्य मध्यमवर्गीय लोकांनी एकमेकांच्या वैयक्तिक श्रद्धा हा पूर्णपणे वैयक्तिक मुद्दा बनवला पाहिजे, धर्माला राजकारण आणि सामाजिक जीवनापासून पूर्णपणे अलग केले पाहिजे, आणि भ्रष्ट, गुन्हेगार व धर्मवादी नेत्यांनी कितीही चिथावणी दिली तरी या तत्त्वाला आपण सोडले नाही पाहिजे. अन्यथा, आपल्या भविष्यात केवळ नाशच लिहिला जाईल.

**जरा त्या देशांवर एक नजर टाका जिथे कोणत्याही प्रकारच्या कट्टरवादी राजकारणाने मूळ धरले आणि लोक त्यात वाहवत गेले आणि मग त्या देशांचे काय झाले? ते नष्ट झाले आणि पुढच्या अनेक पिढ्यांनी या विनाशाची किंमत चुकवली.** जर्मनीमध्ये वर्णद्वेषाच्या नावाखाली हे काम केले गेले. नाझी पक्षाने

ज्यूंना नकली शत्रू बनवून, त्यांना जर्मनीचे शत्रू आणि जर्मनीच्या सर्व समस्यांना जबाबदार धरत बेरोजगारी आणि गरिबीने वैतागलेल्या आणि त्रस्त लोकांसमोर प्रस्तुत केले. जनतेचा मोठा भाग त्यात वाहवत गेला. **शेवटी नाझी जर्मनीचे काय झाले? विध्वंस! नाझींचा नेता हिटलरचे काय झाले? समोर उभा असलेला पराभव पाहून त्याने बंकरमध्ये भ्याडासारखी आत्महत्या केली.** आजपर्यंत, जर्मनीतील सामान्य जनता नाझीवादाचा तिरस्कार करते आणि अजूनही भूतकाळातील चुकांचे आत्मपरीक्षण करते आहे. **इटलीत हिटलरच्या आधी कट्टरवादी राजकारण करणाऱ्या मुसोलिनीचे काय झाले? त्याने त्याच्या पंथवादी (फिरकापरस्त) विचारसरणीपायी संपूर्ण इटली उद्ध्वस्त केला आणि सत्य लोकांसमोर आल्यावर लोकांनी त्याला ठार मारून चौरस्त्यावर लटकवले आणि त्याच्या मृतदेहावर तासन्तास थुंकत राहिले.** अलीकडेच, श्रीलंकेतही वेगळ्या पद्धतीने पंथवादी आणि धार्मिक बहुसंख्यांकवादी राजकारणाचा परिणाम दिसून आला. सिंहली वांशिक आणि धार्मिक अतिरेकामुळे अनेक दशकांपासून श्रीलंका गृहयुद्धात अडकला होता आणि जेव्हा जनतेला एकत्र येण्याची गरज होती तेव्हा ते एकजूटही होऊ शकले नाहीत कारण अतिरेकी राजकारणामुळे जेव्हा देशाला वर्गीय आधारावर एकत्र येण्यापासून रोखले जाते, तेव्हा तो एक समुदाय सुद्धा दीर्घकाळ एकत्र येण्याची शारीरिक आणि नैतिक शक्ती गमावून बसतो. पंथवाद, कट्टरवाद आणि धर्मवाद नेहमीच जनतेमध्ये फूट पाडतात आणि राज्यकर्त्यांना किमान तात्पुरते तरी बळ देतात. **आपल्याला आपल्या देशासाठी सुद्धा असेच भविष्य हवे आहे का? कोणत्याही देशप्रेमीला हे आवडणार नाही.**

## मग मार्ग कोणता?

## क्रांतिकारी धर्मनिरपेक्षताच लोकांना भांडण आणि नरसंहारापासून वाचवू शकते.

मार्ग आहे शहीद-ए-आझम भगतसिंह यांनी सांगितलेल्या क्रांतिकारी धर्मनिरपेक्षतेचा अवलंब करण्याचा. शहीद-ए-आझम काय म्हणाले होते ते त्यांच्याच शब्दात ऐका.

*“1914-15 च्या शहीदांनी धर्माला राजकारणापासून वेगळे*

*केले होते. ते मानत होते की धर्म ही व्यक्तीची वैयक्तिक बाब आहे आणि त्यात इतरांचा हस्तक्षेप नसला पाहिजे. तसेच धर्माला राजकारणात आणता कामा नये कारण तो सर्वांना एकत्र काम करू देत नाही. त्यामुळेच गदर पार्टीसारख्या चळवळी एकसंध आणि एकजीव राहिल्या, ज्यामध्ये शीख मोठ्या संख्येने फाशीवर चढले आणि हिंदू मुस्लिमही मागे राहिले नाहीत.*

...

*"धर्म बाजूला ठेवला तर राजकारणात आपण सगळे एकत्र येऊ शकतो. आपण वेगवेगळ्या धर्मांचे असलो तरी.*

*"आम्हाला वाटते की भारताचे खरे सहानुभूतीदार नक्कीच आम्ही सांगितलेल्या इलाजांवर विचार करतील आणि भारताचा यावेळी जो आत्मघात होत आहे त्यापासून आम्हाला वाचवतील."*

*(भगतसिंह, धार्मिक दंगली आणि त्यावरील उपाय, 1928)*

तुम्ही जर एक न्यायप्रेमी नागरिक असाल, जर तुम्ही एक गंभीर आणि समजूतदार युवक असाल, जर तुम्ही विचार करणारे मेहनती व्यक्ती असाल, ज्याच्या मनात भगतसिंहांसारख्या महान शहिदांबद्दल जराही आदरभावना असेल, तर आम्ही तुम्हाला विनंती करतो की या गोष्टींवर विचार करा. भगतसिंहांनी दाखविलेल्या मार्गावर चला. अन्यथा भगतसिंह यांनी म्हटल्याप्रमाणे भारताला त्याच्या आत्मघातापासून आपण वाचवू शकणार नाही.

संघ परिवार आणि भाजपने "राष्ट्रवाद", "संस्कृतीरक्षण", "धर्मध्वजरक्षण", "चाल-चरित्र-चेहरा", आणि "सदाचारा"चे ढोल वाजवून देशाला कसे मूर्ख बनवले आहे, आणि दंगलीत सामान्य कष्टकरी जनतेचे रक्त सांडवले आहे हे गेल्या चार दशकांत आपण पाहिले आहे. क्षणभरही उघड्या डोळ्यांनी पहाल, खुल्या मनाने विचार कराल तर त्यांचे सत्य तुम्हाला लगेच समजेल. मृत सैनिकांसाठी ताबूत खरेदीत ज्यांनी घोटाळा केला, ज्यांचा अध्यक्ष बंगारू लक्ष्मण लाच घेताना कॅमेऱ्यात पकडला गेला, ज्यांचा नेता दिलीप सिंह जुदेव लाच घेताना हे म्हणताना कॅमेऱ्यात पकडला गेला की "पैसा देव नाही तर देवापेक्षा कमी सुद्धा नाही", ज्यांच्या व्यापम घोटाळा, राफेल घोटाळा आणि आता अदानी-हिंडेनबर्ग घोटाळ्याने संपूर्ण "चाल-चेहरा-चरित्र" उघडकीस

आणले आहे, त्यांच्या "राष्ट्रवादाचे" सत्य एखादा शाळकरी मुलगाही क्षणात जाणू शकेल. त्यांचा "गोरक्षण", "लव्ह जिहाद" चा धर्मवादी आणि उन्मादी अजेंडाही केवळ जनतेची दिशाभूल करण्याची चाल आणि षडयंत्र आहे, हे आपण वर पाहिलेच आहे.

शहीद-ए-आझम भगतसिंह म्हणाले होते:

> *"या दंगलीत खूप निराशाजनक बातम्या ऐकायला मिळत असल्या तरी कलकत्ता दंगलीत एक गोष्ट खूप चांगली ऐकायला मिळाली, ती म्हणजे ट्रेड युनियन कामगारांनी तिथल्या दंगलीत भाग घेतला नाही आणि ते एकमेकांना भिडले नाहीत, उलट सर्व हिंदू-मुस्लीम मोठ्या प्रेमाने कारखान्यात उठबस करत होते आणि दंगली थांबवण्याचाही प्रयत्न करत होते. याचे कारण असे की त्यांच्यात वर्गभान होते आणि त्यांच्या वर्गहिताची त्यांना चांगली जाण होती. हा वर्ग जाणिवेचा सुंदर मार्ग आहे, जो धार्मिक दंगली थांबवू शकतो.*
>
> *"आमच्या कानावर आनंदाची बातमी आली आहे की, भारतातील तरुण आता त्या धर्मांना कंटाळून जे परस्पर भांडणे आणि द्वेष शिकवतात, त्यांपासून दूर जात आहेत. त्यांनी इतका खुलेपणा विकसित केला आहे की ते भारतातील लोकांना धर्माच्या दृष्टीकोनातून हिंदू, मुस्लीम किंवा शीख मानत नाहीत, तर ते प्रत्येकाला प्रथम माणूस म्हणून आणि नंतर भारतीय म्हणून मानतात. भारतातील तरुणांमध्ये या विचारांचा उदय झाल्याने भारताचे भविष्य उज्ज्वल असल्याचे दिसून येते. या दंगली वगैरे पाहून भारतातील जनतेने घाबरू नये. त्यांनी प्रयत्न करावेत की असे वातावरण निर्माण होऊ नये, दंगली होऊच नयेत."*

**मित्रांनो, आज देशाला वाचवण्याचा हा मार्ग आहे. उद्या खूप उशीर झालेला असेल.** तुमचा राग एकमेकांवर आणि एकमेकांच्या धर्म वा पंथाकडे वळवू नका. त्याला तुमच्या खऱ्या शत्रूकडे वळवा. हा खरा शत्रू आहे आपल्या देशातील मालक, धनाढ्य, श्रीमंत व्यापारी, श्रीमंत शेतकरी, दलाल, बिल्डर, मध्यस्थांचा संपूर्ण वर्ग, ज्यांना आपण भगतसिंहाने म्हटल्याप्रमाणे भांडवलदार

**“आपल्या देशात धर्माच्या नावाखाली काही लोक आपल्या नीच हितसंबंधांसाठी लोकांना लढायला-भांडायला लावतात. धर्म आणि श्रद्धेच्या नावाखाली चालणारे हे भयंकर धंदे रोखण्यासाठी धाडस आणि निर्धाराने काम व्हायला हवे.”**

**- गणेश शंकर विद्यार्थी**

वर्ग म्हणतो. हाच भांडवलदार वर्ग देशाच्या सर्व नैसर्गिक साधनसंपत्तीवर, उत्पादनाच्या सर्व साधनांवर आणि सर्व समृद्धीवर कब्जा करून बसला आहे, जेव्हा की त्याने यापैकी कोणतीही गोष्ट स्वतः निर्माण केलेली नाही. सर्व समृद्धीचे स्रोत केवळ श्रम आणि निसर्ग आहे. मग त्यावर खाजगी मक्तेदारी का? यासाठी की या मुठभर श्रीमंत लोकांचा नफा सुरक्षित राहावा आणि आपण झिजत-मरत त्यांची तिजोरी भरत रहावी. आणि जर आपण आपल्या रक्ताचे नाण्यांमध्ये रूपांतर करून त्यांची तिजोरी भरणे सोडले तर आपल्याला जातीय दंगलींच्या आगीत टाकले गेले पाहिजे जेणेकरून आपण आपल्याच भावा-बहिणींना मारून टाकावे किंवा त्यांच्या हाती मारले जावे. हे वास्तव जाणताच तुम्ही समजाल की आपल्याला खऱ्या धर्मनिरपेक्ष राज्याची गरज का आहे.

आमच्या प्रिय देशवासीयांनो, कृपया समजून घ्या की आपली एकच एकजुट बनते आणि ती आहे वर्गाच्या आधारावर. जे आपल्या कष्टाची भाकर खातात, त्यांची एकच जमात आहे, त्यांचे हितसंबंध समान आहेत, त्यांचा शत्रूही सामाईक आहे, तो म्हणजे त्यांच्या कष्टाचे फळ लुटून ऐयाशी करणाऱ्या धनाढ्यांचा परजीवी समूह. जो कोणी धर्माच्या नावावर तुम्हाला भडकावण्याचा प्रयत्न करेल, त्याला कॉलर पकडून तुमच्या घरातून, तुमच्या गल्लीतून, तुमच्या गाव-शहरातून हाकलून द्या, मग तो भगवा घालून आलेला असो वा हिरवा वा पिवळा. **जर आपण हे केले नाही तर आपला नाश होईल. आपल्या येणाऱ्या पिढ्या दंगलीच्या आगीत होरपळून निघतील जर या पंथवादी, कट्टरवादी आणि धर्मवादी शक्तींना आपण पूर्णपणे नाकारले नाही आणि भगतसिंहांच्या शब्दात हे ओळखले नाही की कष्टकरी जनतेचा एकच धर्म, एकच जात, एकच समुदाय आहे, तो म्हणजे एक वर्ग असणे.**

क्रांतिकारी अर्थाने धर्मनिरपेक्षतेचा अर्थ एकच आहे: कोणत्याही स्वरूपात

धर्माचा वापर करणारी, कोणत्याही स्वरूपातील धर्माशी स्वतःला जोडणारी अशी प्रत्येक सत्ता आणि राजकारण नाकारणे; धर्म, धार्मिक अस्मिता किंवा धार्मिक समुदायाचा कोणत्याही स्वरूपात वापर करणाऱ्या किंवा राजकारणात त्यांचे नाव घेणाऱ्या प्रत्येक राजकीय नेत्याला नकार देणे. असे प्रत्येक राजकारण, सर्व धर्माच्या लोकांचे शत्रू आहे.

**मित्रांनो, ही विचारसरणी आणि दृष्टिकोन अंगीकारून आपण संघटित होऊ शकतो, आपल्या जीवनातील खऱ्या प्रश्नांवर लढू शकतो, आपले हक्क जिंकू शकतो, एक नवीन समाज घडवू शकतो. चला, शहीद-ए-आझम भगतसिंह यांनी दाखविलेल्या मार्गावर चला आणि प्रत्येक रंगाचे धर्मवादी राजकारण आणि असे राजकारण करणारे नेते यांना लाथ मारून बाजूला सारून नवा भारत घडवूयात, ज्यामध्ये धर्म, भाषा, जात, प्रांताच्या नावावर माथेफोड होणार नाही. तरच आपण आपल्या भावी पिढ्यांसाठी एक चांगले जग सोडून जाऊ शकतो, अन्यथा भविष्य अंधकारमय असेल.**

**“आमच्या मृत्यूचे थोडेही दु:ख असेल, तर काहीही करून हिंदू-मुस्लीम ऐक्य प्रस्थापित करा. ही आमची शेवटची इच्छा आहे आणि हीच आमची आठवण असू शकते.”**

**- रामप्रसाद 'बिस्मिल'**

## आपल्या मागण्या

1. खऱ्या धर्मनिरपेक्ष राज्याची हमी देण्यासाठी सरकारने ताबडतोब एक विशेष कायदा केला पाहिजे आणि घटनात्मक दुरुस्ती करून धर्माला राजकारण आणि सामाजिक जीवनापासून पूर्णपणे वेगळे केले पाहिजे.
2. वरील कायद्यानुसार, कोणताही राजकीय नेता जो धर्म, धार्मिक चिन्ह, धार्मिक समुदाय, धार्मिक भावना यांचा वापर करतो किंवा त्यांचा कुठेही तोंडी किंवा लेखी उल्लेख करतो, त्याविरोधात कठोर शिक्षा, अजामीनपात्र वॉरंट आणि तुरुंगवासाची खातरी द्यावी.
3. धर्माच्या नावाखाली, मग तो कोणताही धर्म का असेना, कोणत्याही प्रकारची राजकीय संघटना बनवण्यावर पूर्ण बंदी असली पाहिजे.
4. वैयक्तिक कायदा रद्द करून समान नागरी संहिता लागू करावी. भाजप आणि संघ परिवार या मुद्द्याचा आपल्या फायद्यासाठी धर्मवादी पद्धतीने वापर करतात. खरे तर समान नागरी संहिता हे सर्वसामान्य कष्टकरी जनतेच्या हिताचे पाऊल आहे.
5. शाळा, महाविद्यालये आणि कोणत्याही प्रकारच्या सार्वजनिक संस्था, मग ते हिंदू, इस्लाम, ख्रिश्चन, शीख किंवा इतर कोणत्याही धर्माशी संबंधित असोत, धार्मिक प्रार्थना, धार्मिक चिन्हे इत्यादींवर पूर्ण बंदी असावी.
6. पोलीस आणि सशस्त्र दलाच्या छावण्या, पोलीस स्टेशन इत्यादींमधून धार्मिक स्थळे हटवली जावीत, मग तो धर्म कोणताही असो. नागरी सुव्यवस्था पुन:स्थापित करणे हे त्यांचे घटनात्मक आणि औपचारिक कार्य आहे, त्यात धर्माला स्थान नसावे.
7. प्रत्येक व्यक्तीला कोणत्याही धर्माचे पालन करण्याचे किंवा कोणत्याही धर्माचे पालन न करण्याचे पूर्ण स्वातंत्र्य असले पाहिजे, कोणत्याही उपासनेच्या पद्धतीचा अवलंब करण्याचे पूर्ण स्वातंत्र्य असले पाहिजे, परंतु धर्म हा पूर्णपणे खाजगी जीवनाचा विषय असावा. धर्माच्या नावावर आरडाओरडा, हल्ला-गुल्ला करण्याचे स्वातंत्र्य कोणालाही असू नये, कारण तो इतरांच्या नागरी स्वातंत्र्यात हस्तक्षेप आहे.

ही ती मूलभूत पावले आहेत ज्यांची आम्ही मागणी करतो. शहीद-ए-आझम

भगतसिंह यांनी वर दिलेल्या एका अवतरणात नेमके हेच सांगितले आहे. जगातील विविध देशांमध्ये असे कायदे आहेत. या अशक्य मागण्या नाहीत. खरेतर या मागण्यांसाठी लढूनच, आपण आपल्या वैयक्तिक जीवनात कोणतीही श्रद्धा बाळगत, आपल्या आर्थिक, राजकीय आणि सामाजिक मागण्यांवर एकजूट होऊ शकतो, जसे की शहीद-ए-आझम भगतसिंह आणि त्यांच्या साथीदारांनी सांगितले होते. शहीद-ए-आझम भगतसिंह यांच्या वारशावर जर तुमचा विश्वास असेल तर या मागण्यांना पाठिंबा देण्यासाठी भगतसिंह जन अधिकार यात्रेत सामील व्हा, जिचा पहिला टप्पा 12 मार्च ते 14 एप्रिल 2023 या कालावधीत सुरू असेल.

**जात-धर्माचे झगडे सोडा, खऱ्या लढाईशी नाते जोडा!**

**भगतसिंहाचा ऐका घोष, नव्या क्रांतीचा करा उद्घोष!**

**कामगार-कष्टकऱ्यांची वर्ग एकता जिंदाबाद, जिंदाबाद!**

| | | |
|---|---|---|
| यात्रेचा व्हॉलंटियर फॉर्म भरण्यासाठी हा क्यु.आर. कोड स्कॅन करा.करा. | यात्रेबद्दल अधिक माहितीकरिता हा क्यु.आर. कोड स्कॅन करा. | यात्रेच्या व्हाट्सअप ग्रुपसोबत जोडून घेण्यासाठी हा क्यु.आर. कोड स्कॅन करा. |

## आयोजक

# भारताचा क्रांतिकारी कामगार पक्ष (RWPI)

### नौजवान भारत सभा, दिशा विद्यार्थी संघटना, स्त्री मुक्ती लीग, महाराष्ट्र बांधकाम कामगार युनियन

## संपर्क

**महाराष्ट्र:** परमेश्वर 7798364729, बबन 9619039793
**दिल्ली:** योगेश 9289498250, प्रियंवदा 9693469694
**उत्तर प्रदेश:** अमित 8858288593, अविनाश 9891951393
**हरियाणा:** इंद्रजित 8010156365, अजय 8685030984
**बिहार:** अजित 6297974751, वारुणी 7070571498
**उत्तराखंड:** कविता 9971158783, अपूर्व 7042740669
**पंजाब:** इंजिंदर 9888080820, सुखजिंदर 9815705653
**आंध्र प्रदेश:** श्रीनिवास 7995828171, अरुणा 8500208259
**तेलंगण:** आनंद 9971196111; **चंडिगढ:** शुभम 8196803093

WhatsApp Number : 9923875414 /bsjayatra